# DAY TO DAY ENGLISH
# डे टू डे इंग्लिश

**आशा रतनजी**

**लता कित्तूर**

**ॐ पब्लिकेशन्स्**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**Day to Day English : डे टू डे इंग्लिश**
आशा रतनजी, लता कित्तूर

© **आशा रतनजी, लता कित्तूर**
बंगला नं. ७१, एलफिस्टन रोड,
कँप बेळगाव– ५९०००१
फोन नं. (०८३१) २४२३५२५

**प्रकाशक**
ॐ पब्लिकेशन्स्
६७८, सृष्टी विष्टा, निदान समोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९६८ ९९९५ ३००

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये १५०/–

# Dedication

अव्वा,

तुझ्या मोठ्या मुलासारखं (दादा–माझ्या आजोबासारखं) मलाही फाडफाड इंग्लिश बोलता यायला हवं ही तुझी इच्छा मी कधीच पूर्ण केलीय. इतरांनाही फायदा व्हावा म्हणून हा लेखनप्रपंच. पेसी अंकल आणि गुडबॉडी अंकल, केवळ तुमच्यामुळेच मी मला इंग्लिश बोलता यायला हवं हा विचार करू शकले. तिनइकर, आठवले, चित्रे बाई आणि बेतकेकर सर, मराठी शाळेमधल्या मुलींना इंग्लिश बोलता यायला हवं म्हणून प्रयत्न करणारे तुमच्यासारखे शिक्षक मला मिळाले. इंग्लिश बोलावं कसं, हे कुंदाताई बेळगावकरांनी शिकवलं. या भाग्याची मी मानकरी आहे. हे पुस्तक तयार करताना प्रचंड वेळा जाणवलं, मला इंग्लिश येतं त्यामागे सगळा रुस्तमच तर आहे. माझ्या नकळत माझ्या चुका त्यानंच तर सुधारल्या. आजही जुबीन, मेहनोश आणि झरीर ही माझी मुलं उच्चार कसा चुकला ते सांगतात पण नकळत नाही. मस्तपैकी कोलगेटची जाहिरात करतात. सुमिता मात्र तसं नाही करत. अनंत मनोहर आणि शीतल मेहता यांचं प्रोत्साहन यामुळे हा योगायोग ऑक्टोबर २००९ पासून सुरू झाला आणि तो सिलसिला चालूच राहणार याची खात्री आहे.

आजही मास्तरीण हा शब्दसुद्धा कुचेष्टेनं बरेचजण वापरतात. ३७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत गणित शिकवताना मास्तरीण म्हणवून घेतलं पण कधीच कमीपणा वाटला नाही. या पुस्तकासाठी काम करताना आम्हा दोघींनाही मास्तरीण असल्याचा अक्षरशः अभिमान वाटत राहिला. शिक्षिका होतो म्हणून तर हे सगळं नीट व्हावं यासाठी प्रयत्न करू शकलो.

लताच्या शब्दात "This work is dedicated to my grandmother, who insisted that I speak proper English & to my students who made me learn the fundamentals of English."

या पुस्तकात अमुक माझं, तमुक लताचं असं काहीही नाही. आहे ते आम्हा दोघींचे मिळून. चुका झाल्या असतील याची कल्पना आहे. पुन्हा पुन्हा नजर

टाकूनही नजरचुका होतात याची कल्पना आहे. काही राहूनही गेलं असणार. शिव्या आम्हालाच येत नाहीत. कुणाला त्या याव्यात असं वाटत नाही. स्वरावरून त्या कळतात. म्हणून त्या नाहीत. काही आवडलं नाही तर कृपया कळवा. प्लीज! आणि आवडलं तर..तर.. तेच आमचं यश!

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

प्रिय वाचक,

आम्हा दोघींच्या पहिल्यावहिल्या 'जॉइंट व्हेंचर'चं यश आश्चर्यचकित करणारं आहे. याचा फार आनंद वाटतोय. चुकीची दुरुस्ती वाचकांनी आमच्यापर्यंत पोहोचविली, याचा अर्थ त्यांनी पुस्तक व्यवस्थित आणि संपूर्ण वाचलंय असाच तर होतो. असंख्य रसिक वाचकांसाठी आम्ही दोघींनी पुस्तक पुन्हा पहिल्या पानापासून तपासलं. सगळ्या चुका दुरुस्त केल्या. कोल्हापूरची वारी करून श्री. देसाईंनी प्रुफ रिडींगला मदत केली. पुस्तक आणखी चांगल्या स्वरुपात सादर करण्यासाठी प्रयत्न करताना आम्हा दोघींना आनंदही झाला.

We enjoyed the whole experience

अल्पावधीत 'दुसरी आवृत्ती' या यशात आमचं लिखाण इतक्या चांगल्या पद्धतीनं, उत्कृष्ट मुखपृष्ठासहीत सादर करणाऱ्या ॐ पब्लिकेशन्स्‌चा सिंहाचा वाटा आहे. श्री. शितल मेहता, श्री. अनंत मनोहर, श्री. रावजी देसाई, आणि इंग्लिश बोलण्यासाठी उत्सुक असणारे वाचक यांचे ऋण आम्हाला भूषणावह आहे.

**आशा रुस्तम रतनजी** **लता अनिल कित्तूर**

# INDEX


1. Foreword .......................................................... 9
2. Words used in the book .................................... 14
3. Alphabets ......................................................... 16
4. Words generally used ....................................... 25
5. Parts of speech ................................................. 74
6. Proper use of the verb ...................................... 141
7. Forms of Verbs ................................................. 149
8. Articles ............................................................. 158
9. The Infinitive... it... can... may. ............................ 178
10. Tenses and Uses of Tenses ............................... 189
11. Homophones. .................................................... 241


✦✦✦

# Foreword

श्रीगणेशा!

इंग्लिश बोलता यायला हवं ही आजची गरज आहे. तुमचं शिक्षण, हुशारी, पात्रता, स्टेटस्, कार्यक्षेत्र, आर्थिक स्थैर्य, सबलता या साऱ्यांबरोबर इंग्लिश भाषा येणंही आज महत्त्वाचं आहे. स्वत्त्व, अस्मिता, स्वाभिमान या खऱ्या तर गृहीत गोष्टी, पण त्यांनाही इंग्लिश येणं हे कवच हवंय.

कुठलीही भाषा शिकणं अवघड नाहीच मुळी. लहान बाळ कानावर पडणारी भाषा अगदी सहज शिकतं. त्याचं वय त्याला कुठल्याही अभिनिवेशाविना नवी भाषा शिकायला प्रवृत्त करतं पण वयानं वाढलेल्यांना चिंता असते ती,

मला कुणी हसेल का? – हसतील ही खात्री.

माझी कुणी चेष्टा करेल का?– करतील ही खात्री.

आता या वयात कसं येणार?– येणार नाही ही खात्री.

आपण नव्यानं शिकतो आहोत. अडखळायला होणारच. अडखळणं फक्त बालकाच्या बाबतीत कौतुकाचं असतं. हसतील त्यांचे दात दिसतील असं स्वत:ला सांगायचं. मला टिंगल ऐकू येतच नाही, असं समजायचं आणि या वयातही मी इंग्लिश बोलायला शिकणारच असं स्वत:लाच बजावायचं आणि ठामपणे बोलायला लागायचं. काही छोट्या मोठ्या गोष्टी लक्षात ठेवल्या आणि केल्या म्हणजे तुमचं तुमच्याच लक्षात येईल. ''आपल्याला इंग्लिश बोलता येतंय आणि तेही fluently."

गरज आहे ती फक्त इच्छाशक्तीची. ती ज्योत एकदा प्रकाशली की झालं; म्हणून ते काम सर्वांत आधी. लक्षात ठेवायचं...

- ज्यांना इंग्लिश बोलता येतं, त्यांच्याशी इंग्लिशमधून बोला. तेही न लाजता. आपल्या घरची मंडळी, लहान मुलं, मैत्रिणी यांना तुमच्या चुका सांगायची विनंती करा. चुकांची दुरुस्ती करण्याचा सतत प्रयत्न करा.
- स्वत:शी विचार करताना इंग्लिशमध्ये करण्याचा प्रयत्न करा. ही गोष्ट सुरुवातीला खूपच कठीण वाटते खरी पण सवयीनं नक्की जमायला लागते.
- आपल्या चुका होणार हे गृहीतच धरा. चुकलं तरच दुरुस्त करता येतं. कुठलीही गोष्ट शिकताना, नव्यानं करताना चुका या व्हायच्याच. पण त्या नेहमी तशा थोड्याच होणार?
- ग्रामर महत्त्वाचं आहे पण वाक्य व्याकरणाच्या दृष्टीनं १००% बरोबर असायलाच हवं असा अट्टाहास नकोच. मातृभाषा असूनही मराठीत तरी आपण परिपूर्ण कुठे बोलतो? तेव्हा चुकांची भीती वाटत असेल तर ती मनातून काढूनच टाका.
- इंग्लिश वाक्यरचना वेगळी असते. म्हणून पाठांतर न करता ती लक्षात घ्यायला हवी. मराठीतून इंग्लिशमध्ये भाषांतर करताना शब्दाला शब्द असे कधीच करू नये. कर्ता कर्म क्रियापद यांची जागा इंग्लिशमध्ये कुठे असते हे समजावून घेणे महत्त्वाचे. म्हणजे त्याप्रमाणे रचना करणे शक्य होते.
- वाचन हा भाषा समजून घेण्याचा अतिशय चांगला मार्ग आहे. इंग्लिशमधील छोट्या छोट्या गोष्टी वाचा. सिंड्रेला, टारझन, ब्यूटी अँड द बीस्ट, हिमगौरी आणि सात बुटके, पंडोरा, अरेबियन नाईट्समधल्या कथा जरूर वाचा. हवं तर आधी या कथा मराठी अनुवादातून वाचाव्या मग इंग्लिशमधून. वाक्यचरनेमधला फरक सहजी कळतो. आणि पटणार नाही पण गॉसिप मॅगझिनमुळे इंग्लिश कळायला लागतं, आवडायला लागतं हे खरं. एक तर वरच्या मजल्याला त्रास नसतो. दुसरं, नटनट्यांच्या खाजगी जीवनाबद्दल अमाप उत्सुकता असते. तिसरं, वाचून विसरायचंच तर असतं. चौथं, समजायला हवं असतं की नक्की काय प्रकार आहे, म्हणून नकळत मन लावून वाचलं जातं, समजायलाही लागतं. कुणाच्या का कोंबड्यानं पण सूर्य

उगवतो हे महत्त्वाचं. पण तेवढ्यावर थांबायचं नाही. अनुवादित कादंबऱ्या वाचाव्या आणि नंतर मूळ इंग्लिश कादंबरी वाचावी. वाचलेलं समजलं तरच आणखी वाचावंसं वाटतं.

* वाचनापेक्षाही जास्त उपयोग होतो तो इंग्लिश ऐकण्याचा. इंग्लिश बोलणाऱ्याकडे नीट लक्ष द्या. भाषा ऐकून जितकी चांगली येते, तेवढी इतर कोणत्याही उपायाने येत नाही. T. V. वरील इंग्लिश बातम्या ऐकल्यानं आपलं इंग्लिश सुधारतंय, उच्चार, आघात, वाक्यरचना, अर्थ सगळ्या आघाड्यांवर आपली कामगिरी चांगली व्हायला लागली आहे, हा विश्वास आपोआपच यायला लागतो. बरं, आपण फक्त ऐकायचं आहे. उत्तर तर द्यायचं नाहीच. त्यामुळे सगळं लक्ष ऐकण्यावरच केंद्रित करता येतं. वाटल्यास आधी मराठीतल्या ठळक बातम्या ऐकाव्या. मग इंग्लिशमधून सविस्तर. पोहणं, सायकल चालवणं या जशा सवयीनं प्रतिक्षिप्त क्रिया बनतात, तसं इंग्लिश बोलणंसुद्धा आपोआप जमायला लागतं हे नक्की.
* क्रिकेट, फुटबॉल, टेनिस या मॅच बघा. भले समजो वा न समजो. आधी खेळ समजला नाही तरीसुद्धा समजायला लागतो. खेळ समजावा यासाठी कॉमेंट्री मदत करतेच करते. ती ऐकताना इंग्लिश हलके हलके समजायला लागतं. सोपं वाटायला लागतं. सुनील गावसकरची भाषा फार सहजी येते. रवी शास्त्री समजायला सोपे नि सिद्धू काय म्हणताहेत नक्की ते कळावं म्हणून ऐकण्याचे प्रयत्न करावे लागतात. प्रेझेंटेशनच्या वेळी लक्षात येते, अरे इंग्लिश खूप किंवा चांगलं न येणारी मी एकच व्यक्ती नाहीय. सेलेब्रिटीसुद्धा अडखळतात. चुकीचं, चक्क चुकीचं बोलतात. धक्का असतो इंडियाला बसलेला पण मारतात दुसऱ्या टीमच्या माथ्यावर.

इंग्लंडमध्ये राहूनसुद्धा विजय अमृतराज खूपच सोपं, समजणारं. साध्या, स्पष्ट उच्चारातलं इंग्लिश बोलतात. जरूर ऐका. अनुभव घेतला की पटेल. फॉरिनर्सचं इंग्लिश कळो वा न कळो पण ॲक्सेंट मस्त वाटतात. मनात येतं ''मलाही येईल असं स्टायलिश फास्ट बोलणं?'' येईल–नक्की येईल.

या पुस्तकात काही इंग्लिश शब्द कंसात तर काही मराठी शब्द कंसात दिले आहेत. काही शब्द पुन्हा पुन्हा लिहिले आहेत. काही माहिती वेगवेगळ्या प्रकारांनी, पण तीच, सांगितली आहे. उच्चार मराठीत दिले नाहीत, काही अपवाद सोडून. (कारण जे ठाऊक आहेत ते गृहीत धरलेलं आहे) संदर्भ वेगळे जरी असले तरी रिपिटेशन आहेच.

मोठ्यानं वाचा असं सांगितलं आहे. मोठ्यानं वाचताना तीन ज्ञानेंद्रिये एकाच वेळी कार्यरत होतात. नेत्र, वाचा, कान. एकच वाक्य पाहिलं जातं, वाचलं जातं, ऐकलं जातं. म्हणून ते मेंदूपर्यंत तीन प्रकारांनी पोहोचतं. लक्षात राहणं तीन पटीनं वाढतं. लहानपणी– आमच्या हं, म्हणजे ४५ ते ५० वर्षांपूर्वी–पाढे–परवचा–स्तोत्र (रामरक्षा, मारुती स्तोत्र इ.) मोठ्याने का म्हणायला लावत त्याचं उत्तर आजही तेवढ्याच महत्त्वाचं आहे.

या पुस्तकानं आम्हा दोघींना एक गोष्ट छानच शिकवली. आपल्याला कितीतरी गोष्टी येत नव्हत्या. ठाऊक नव्हत्या. कितीतरी शिकायचं राहूनच गेलं होतं. हा सगळा लेखनप्रपंच करताना खूप खूप शिकायला आलं. ज्याच्यामुळं हे झालं ते अनंत मनोहर, श्री. शीतल मेहता आणि ज्यांच्यासाठी या पुस्तकाचा विचार आणि खटाटोप केला ते तुम्ही सगळेच्या सगळे वाचक या सगळ्यांचे ऋण आम्ही भूषणावह मानू.

काही वेळा धेडगुजरी भाषा वापरली आहे. Verb चे तिसरे रूप अशी उदाहरणं तुम्ही शोधून काढू शकता.

मराठीत काही शब्द गृहीत धरलेले असतात. ते वाक्यात वापरले जात नाहीत. पण इंग्लिशमध्ये वापरावे लागतात. मराठीत आपण हातात म्हणतो, तिच्या हातात, त्याच्या हातात असे शब्द वापरत नाही. पण इंग्लिशमध्ये her hand, in his hand असं म्हणावं लागतं.

कधी कधी तुम्हाला इंग्लिशमधला एखादा शब्द आमच्या मराठी भाषांतरात सापडणार नाही. कारण भाषांतर करताना त्या अर्थाचा मराठीमधला त्या वाक्यात वापरला जाणारा शब्द वापरला आहे.

तुम्हाला शिकवण्याचा आमचा अट्टाहास नाहीच आहे. इंग्लिश बोलता यायला हवं... छान fluently म्हणून तुमचं बोट धरून पुढे जायला आम्ही मदत

करणार एवढाच आमचा रोल. सगळं करायचं ते तुमचं तुम्हीच. कसं करावं याचं थोडं मार्गदर्शन करणार. मोठी बहीण-मावशी-जिवलग अशी काहीशी भूमिका आहे आमची दोघींची.

आमच्या चुका कदाचित नकळत झाल्या असतील पण त्या आमच्यापर्यंत कृपया पोहोचवा. तेव्हा तुमची भूमिका बहिणीची-मावशीची!

पुस्तक एकदा फक्त वाचा. अभ्यासाच्या दृष्टीनं मुळीच नको. आवडलं तरच पुन्हा पहिलं पान उघडा. आता मात्र अभ्यास करायचा, बोलायला शिकायचं नि पारंगत व्हायचं या विश्वासानं. तेव्हा,

**श्री सरस्वतीचं स्तवन करून,**
**श्री गजाननाला वंदन करून,**
**करूया श्रीगणेशा**

✦✦✦